| | |
|---|---|
| MHKO070008772014 | **<u>रे.क.नं.१३४/२०१४</u>**<br>शशिकांत दिगंबर रावळ आणि इतर<br>विरुध्द<br>संभाजी लिंबाजी पाटील |

## <u>निशाणी क्र.९३ खालील आदेश</u>

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले.

२. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, यातील वादींनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाई ताकीदीचा दावा दाखल केलेला असुन प्रतिवादीनी नि.क्र.४६ वर अ.नं.१ वर दि.८/५/७० रोजीचा खरेदी दस्त हजर केला आहे. सदरचा दस्त वादीचे चुलते विठ्ठल रामचंद्र रावळ, गजानन विठ्ठल रावळ, रामचंद्र विठ्ठल रावळ व अभिमन्यू विठ्ठल रावळ यांनी प्रतिवादीचे आजोबा श्री.भाऊ गोपाळ पाटील, रा.शिरोळ यांच्या लाभात करुन दिला होता. यातील प्रतिवादी तर्फे हजर केलेला दस्त मुळ/अस्सल आहे. तसेच सदरचा दस्त ३० वर्षापुर्वीचा असलेने सदर दस्तास निशाणी देवुन तो दस्त या कामी पुराव्यात वाचणेत यावा. त्याचप्रमाणे प्रतिवादीने नि.क्र.४६ सोबत अ.नं.३ ते ११ वर ३२ग प्रमाणे दावा मिळकतीची जी किंमत ठरविण्यात आली ती किंमत शासनाकडे जमा केली व त्याबाबतच्या पावत्या असुन त्या शासनातर्फे प्रतिवादीच्या पुर्वहक्कदारांना मिळालेल्या आहेत. सदरच्या पावत्यावर त्यावेळचे तहसिलदार व ट्रेझररी ऑफीसर यांच्या सहया आहेत. सदरच्या पावत्या देखील ३० वर्षापुर्वीच्या असल्याने त्यांना या कामी निशाणी देवुन पुराव्यात वाचण्यात याव्यात अशी विनंती केली आहे. विरुध्द बाजुने त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे नोंदवुन कथन केले आहे की, सदरचा अर्ज व त्यातील मजकुर

वादींना मान्य व कबुल नाही. केवळ कागद ३० वर्षांपुर्वीचा आहे म्हणुन त्यास कायदयाने कोणतेही presumption नाही. त्यामुळे तो कागद भारतीय साक्ष अधिनियम मधील तरतुदीनुसार शाबित केल्याशिवाय पुराव्यात वाचता येणार नाही. तसेच त्यास निशाणीही देता येणार नाही. सबब अर्ज नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

४. वादीने प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा भारतीय साक्ष अधिनियम कलम ९२ नुसार दिल्याचे नमुद आहे. त्यानुसार

> ***Presumption as to documents thirty years old.*** *Where any document, purporting or proved to be thirty years old, is produced from any custody which the Court in the particular case considers proper, the Court may presume that the signature and every other part of such document, which purports to be in the handwriting of any particular person, is in that person's handwriting, and, in the case of a document executed or attested, that it was duly executed and attested by the persons by whom it purports to be executed and attested.*

वर नमुद कलमामध्ये may presume असे नमुद केलेले आहे. त्यामुळे may presume म्हणजे काय याचा ऊहापोह करणे गरजेचे आहे. भारतीय साक्ष अधिनियम कलम २(h) नुसार

> ***(h) "may presume".-****Whenever it is provided by this Adhiniyam that the Court may presume a fact, it may either regard such fact as proved, unless and until it is disproved or may call for proof of it;*

५. त्यामुळे वरील दोन्ही कलमामध्ये नमुद मजकुर पाहता सदर कागदपत्रांची अंमलबजावणी ही गृहीत धरता येते. त्यामुळे त्यानुसार त्यास निशाणी क्रमांक देता येईल. त्याबरोबरच त्यातील मजकुरासबंधी प्रतिवादीने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच प्रतिवादीने दाखल केलेले public documents यास निशाणी क्रमांक देता येईल. त्यामुळे त्याप्रमाणे सदरचा अर्ज हा निकाली करण्यात येतो.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.02.24 17:15:51 +0530

दि.२४/०२/२०२६ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 24/02/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 24/02/2026. |
| Judgment/order uploaded on | 24/02/2026. |